**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : mcm.dte@gmail.com Website: http://www.dte.org.in

# अधिसूचना

# अल्पसंख्यांक उमेदवारांकरिता रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम

निरंतर प्रशिक्षण योजना / तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ / मुक्त विद्यापीठ यांचेमार्फत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शिख, पारशी) विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती म्हणून प्रती विद्यार्थी प्रशिक्षण शुल्काची प्रत्यक्ष रक्कम किंवा रुपये ४०००/- यापैकी जी कमी असेल एवढी रक्कम अदा करण्याची योजना शासन निर्णय क्र. अविवि- २००० / प्र.क्र.४१/ ०९/ का.१ दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ नुसार जाहीर करण्यात आली आहे. सन २००८-२००९ साली प्रशिक्षण घेत असलेल्या ५००० निवडक अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल.

**योजनेच्या अटी व शर्ती**

- विद्यार्थ्यांची निवड त्यांनी शालांत परीक्षेमध्ये मिळविलेल्या गुणानुसार गुणवत्तेवर आधारीत राहील.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २.५ लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे.
- अर्जदार भारतीय नागरिक असावा असा उल्लेख केलेल्या अल्पसंख्यांक समाजातील व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

- विद्यार्थ्याची स्वतःची स्वाक्षरी असल्याचे पासपोर्ट आकाराचे छायांकित प्रत.
- शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्यांची गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा पुरावा उदा. शिधापत्रिकेची प्रत / वीज, दूरध्वनी देयकाची प्रत / पारपत्राची प्रत / निवडणुक ओळखपत्राची प्रत यापैकी कोणतेही एक.
- स्वतःचा व्यवसाय असलेल्या पालकांच्या बाबतीत उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतांद्वारे मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाविषयीचे अ-न्यायीक स्टॅम्प पेपरवरील घोषणापत्र / नोकरीस असलेल्या पालकांच्या बाबतीत नियोक्त्यांकडून प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर विवरण पत्राची सत्यप्रत.

अर्जदाराने विहित नमुन्यामध्ये अर्ज करुन आवश्यक कागदपत्रांसह प्रशिक्षण घेत असलेल्या संस्था प्रमुखाकडे सादर करावा. अर्जाचा नमुना www.dte.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज पूर्ण भरुन प्राचार्यांकडे सादर करावयाची अंतिम तारीख २६/२/२००९ ही राहील. निवड झालेल्या उमेदवारांची यादी संचालक तंत्र शिक्षण निश्चित करतील व www.dte.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करतील.

**अल्प मुदतीच्या प्रशिक्षणाची यादी शासन निर्णयाच्या प्रपत्र-क मध्ये देण्यात आलेली आहे.**

अधिक माहितीकरिता ०२२-२२६१७९६१ वर संपर्क साधावा.

सही/-
( डॉ. सु. का. महाजन )
प्र.संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई